# पाऊस चांगला झाल्याने येवती परिसरात खरिपाच्या पेरणीला ट्रॅक्टरने सुरुवात

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**रिसोड** - रिठद पासून जवळच असलेल्या येवती गावातील शेतकऱ्यांनी पाऊस चांगला झाल्याने पेरणीला सुरुवात केली आहे. अनेक शेतकरी आपल्या शेतात ट्रॅक्टरच्या माध्यमातून पेरणी करतांना दिसत आहेत.



येवती येथील जनार्दन पाटील शिंदे या शेतकऱ्यांची जवळपास ३०-४० एकर जमीन असून आज पासून ट्रॅक्टरने पेरणी चालू केली आहे. यांच्यासोबतच इतर शेतकरी सुद्धा पेरणी करत आहे. सध्या स्थितीत पाण्याची उघडीप असल्याने पेरणी मात्र चांगली होत आहे. पावसाचा कोणताही अडथळा पेरणी दरम्यान येत नसल्याने जमीनीतील माती मोकळी झाली आहे. व पेरण्या योग्य वातावरण असल्याने परिसरातील शेतकरी पेरणीच्या कामाला लागले आहेत. परंतु काही प्रमाणात उष्णता कमी झाली तरी जमिनीतील उष्णता कमी होणे गरजेचे आहे. या पेरणीवर उष्णतेचा किती परिणाम होतो. हे येणारा काळच सांगेल.

# मालेगाव येथील इस्तेहार खान बेपत्ता पोलीसांचा शोध सुरू

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**मालेगाव**- शहरातील इस्तेहार खान गफार खान ऊर्फ राजू (वय ४०) हे दि. १३ जून रोजी सकाळी ८ वाजता नेहमीप्रमाणे मालेगाव येथील बेडिंगच्या दुकानात कामासाठी घरातून बाहेर पडले. मात्र त्यानंतर ते घरी परतलेच नाहीत.



त्यांच्या बेपत्ता झाल्याची खबर त्यांचा भाऊ इमरान खान यांनी पोलीस स्टेशन मालेगाव येथे दिल्यानंतर पोलीसांनी शोध मोहीम सुरू केली आहे. बेपत्ता इस्तेहार खान यांची उंची सुमारे ५ फूट ४ इंच असून शरीरयष्टी सडपातळ आहे. रंग काळासावळा, चेहरा लांबट असून डोळे मध्यम व केस काळे आहेत. त्यांनी हरवण्याच्या दिवशी अंगावर चंदेरी रंगाची अर्धी बाह्यांची टी-शर्ट, निळी पँट व पायात साध्या चपला परिधान केल्या होत्या. ते हिंदी व मराठी भाषेत संवाद साधतात. त्यांचे शिक्षण बारावीपर्यंत झाले आहे. इस्तेहार खान यांचे बेपत्ता होणे हे कुटुंबीयांसाठी अत्यंत चिंतेचा विषय बनले असून, त्यांचा कुठलाही ठावठिकाणा लागत नसल्याने मालेगाव पोलीसांनी नागरिकांना मदतीचे आवाहन केले आहे. कोणीही त्यांना पाहिले असल्यास तातडीने खालील संपर्क क्रमांकावर माहिती देण्याचे आवाहन पोलिस निरीक्षकांकडून करण्यात आले आहेः सदर प्रकाराची नोंद पोलीस स्टेशन मालेगाव येथे मिसिंग क्रमांक ३४/२०२५ अंतर्गत करण्यात आली असून पुढील तपास पोलीस निरीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

**संपर्कः**
पोलीस निरीक्षक संजय चौधरी - ८८८८७६८२१८
स.पो.नि. सागर इंगळे - ९९२२४४१२६२ पो.ह. किशोर चिंचोळकर - ९०११४४०९९९ पोलीस स्टेशन मालेगाव - ०७२५४-२७१२५३

## सन्मानाचा सोहळा थाटात...

# पुरस्कार प्राप्त अरुणाताई ताजणे व आनंद सुतार यांचा गौरव

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**वाशिम** - डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्काराने सन्मानित अरुणाताई ताजणे आणि साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्काराने सन्मानित आनंद संभाजी सुतार यांचा भव्य सत्कार समारंभ वाशिम येथे उत्साहात पार पडला.





या सत्कार सोहळ्याचे आयोजन महाराष्ट्र पोलिस बॉईज संघटना जिल्हा शाखा आणि ग्रोफिलिक्स कंपनी यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. कार्यक्रमाचे संयोजन कपिल साठे (जिल्हाध्यक्ष - महाराष्ट्र पोलिस बॉईज संघटना) आणि ॲड. स्वाती देशमुख/साठे (जिल्हाध्यक्षा - महाराष्ट्र पोलिस महिला संघटना) यांनी केले. सत्कारमूर्तींचे शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष अण्णाभाऊ साठे पुरस्कार प्राप्त मेजर चंद्रभान पोळकर होते. विशेष उपस्थितीत सत्कारमूर्ती आनंद सुतार, सौ. आशा सुतार, अरुणाताई ताजणे, बबनराव ताजणे यांचा समावेश होता. कार्यक्रमाची सुरुवात पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर ज्ञानेश्वर कांबळे यांनी सादर केलेल्या स्वागतगीताने वातावरण भारावून गेले. संजय बाजड वनोजा यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना मांडली, तर राऊत सर यांनी सत्कारमूर्तींच्या कार्यावर सविस्तर प्रकाश टाकला. या प्रसंगी प्राचार्य अश्रुजी जाधव, रामेश्वर पाटोळे, डॉ. मंजुश्री जांभरुणकर, शंकुतला वंजारे, शोभा खोडके, प्रशांत दाभाडे, अर्जुन राऊत यांनी ताजणे मॅडम आणि सुतार सर यांच्या कार्याचा गौरव करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमात बोलताना डॉ. रामकृष्ण डोंगरे (मुख्य संपादक - युगबदल चॅनेल व अनुसूचित जाती सेलचे अध्यक्ष) यांनी अण्णाभाऊ साठे पुरस्काराची प्रक्रिया स्पष्ट करताना सांगितले की, 'हा पुरस्कार एकट्या सुतार सर वा ताजणे मॅडम यांचा नसून संपूर्ण समाजाचा आहे. 'कार्यक्रमाला दशरथ दाभाडे, माधवराव दाभाडे, रमेश दाभाडे, आशुतोष सुतार, चंचल वानखेडे, मनीषा वानखेडे, विजय डोंगरे, सीमा दाभाडे, भगवान वैरागड, श्रावण उबाळे, रमेश बांगर, विशाल डोंगरे, अकोल्याचे अवचार, ?ड. पारवे, नंदू कांबळे यांच्यासह शेकडो सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन ॲड. स्वाती देशमुख/साठे यांनी तर अल्पोपहाराने या प्रेरणादायी कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. या सोहळ्याचे यशस्वी आयोजन पुष्कर साठे, खुशी साठे, मनोज कव्हर, तसेच कपिल भाऊ साठे आणि स्वाती साठे यांनी परिश्रमपूर्वक केले. हा कार्यक्रम सामाजिक सन्मान व एकजुटीचा प्रतीक ठरला.

# साडेतीन किलो गांजासहित आरोपी अटक

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**कारंजा लाड** - येथील बस स्टँड टी पॉइंट वरून काड्या रंगाच्या बॅग मध्ये गांज्याचे पॉकेट भरून एक व्यक्ती नेत असल्याची गुप्त माहिती मिळाल्या वरून कारंजा शहर पोलिसांनी सापडा रचून आरोपीस अमली पदार्थ गांज्या सहित आरोपी रियाजुल्लाह खान उर्फ राजू समिअल्लाह खान(३१) रा. मंगळवारा कारंजा लाड जिल्हा वाशिम याला १३ जूनच्या रात्री मुद्देमाल सहित ताब्यात घेतले व त्याच्या विरुद्ध एन.डी.पि.एस. कायदानुसार १९८५ नुसार १४ जून च्या सकाळी दोन वाजता गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहीती मिळाली आहे. या कार्रवाईत पोलिसांचा कार्यक्षमतेचे आणि गांजा तस्करीविरोधी प्रतिबद्धतेचे उदाहरण समोर आले आहे.



मिळालेल्या माहिती नुसार आरोपी टी पॉइंट वरून काड्या रंगाच्या बॅग मध्ये गांज्या सदृश्य अमली पदार्थ चे १४ पॉकेट खाकी रंगाच्या टेप ने पॅक केलेले घेवून जात होता त्या पॉकेट मध्ये गांजा सहित अमली पदार्थ ३ किलो ५५७.७ ग्रॅम मिळुन आले. त्याची अंदाजे किंमत ५२ हजार ५०० रुपये असल्याची माहिती मिळाली आहे. अशा प्रकारच्या कारवायामुळे समाजात गांजा आणि इतर अमली पदार्थाच्या तस्करी विरुद्ध जणजागृति होईल आणि पोलिसाचा कार्यक्षमतेला बळ मिळेल. सदर ची कार्यवाही ही पोलिस अधिक्षक अनुज तारे. अप्पर पोलिस अधिक्षक लता फड मॅडम, उपविभागिय पोलिस अधिकारी प्रदिप पाडवी, रामकृष्ण महल्ले, पोलिस निरिक्षक दिनेशचंद्र शुक्ला यांचे मार्गदर्शनात सपोनि प्रशांत सुबनावळ, पोहेका गणेश जाधव मयुरेश तिवार पोहवा उमेश कुमार बिबेकर अनिस निन्सुरवाले मोहम्मद परसुवाले. पोकाँ नितीन पाटील अमित भगत तसेच स्थानिक गुन्हे शाखा वाशिम येथिल पोलीस अमलदार पोहवा गजानन झगरे, पोहवा गजानन अवघडे, सुनिल तायडे यांनी केली असुन पुढील तपास सपोनि जयदिप पवार करीत आहे.

# आशा सेविका आणि गटप्रवर्तकांचे सात महिन्यांचे मानधन थकीत

## उपासमारीच्या उंबरठ्यावर कुटुंबे!

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**मेडशी** - राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत शेवटचा पण अत्यंत महत्त्वाचा घटक असलेल्या आशा स्वयंसेविका आणि गटप्रवर्तकांचा सात महिन्यांचा मोबदला शासनाकडून थकवण्यात आला असून, सध्या त्यांच्यावर उपासमारीची वेळ येऊन ठेपली आहे.



राज्य शासनाच्या आणि केंद्र शासनाच्या व्यवस्थापनातील गलथानपणामुळे तब्बल १०७१ आशा सेविका आणि ४५ गटप्रवर्तक आर्थिक अडचणींचा सामना करत आहेत. नोव्हेंबर २०२४ पासून आजपर्यंत त्यांच्या मानधनाचा एकही पैसा शासनाकडून जमा करण्यात आलेला नाही. दरम्यान, शासन मात्र दिवसेंदिवस ऑनलाईन कामाची सक्ती करत आहे. प्रधानमंत्री मातृवंदना योजना, क्षयरोग व कुष्ठरोग सर्वेक्षण, डेंग्यू तपासणी, आरोग्य कार्ड रजिस्ट्रेशन, बालमृत्यू व मातामृत्यू दर कमी करण्यासाठी दिवस-रात्र खपणाऱ्या या महिला आरोग्य सेविकांच्या कष्टांना शासनाने अक्षरशः पायदळी तुडवलं आहे, असा संतप्त आरोप संबंधित संघटनांकडून करण्यात येत आहे. सात महिन्यांचा मोबदला थकवल्यामुळे या महिलांच्या घरातील गॅस सिलिंडर बंद, किराणा उधारी थकलेली, शाळा-फीस भरता येत नाही, औषधोपचार शक्य नाहीत, अशी दयनीय अवस्था झाली आहे. दरम्यान, शासनाचे प्रतिनिधी आणि आरोग्य विभाग मात्र 'निधी नाही' चा जप करत शांत बसले आहेत. राज्य शासन आणि केंद्र शासन यांच्यातील निधीच्या राजकारणात आशा सेविका आणि त्यांच्या कुटुंबांचे आयुष्य अक्षरशः होरपळून निघाले आहे.

यासंदर्भात महाराष्ट्र राज्य आशा व गटप्रवर्तक संघटनेने तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे. लवकरच साखळी उपोषण, रास्ता रोको, घेराव अशा तीव्र आंदोलनात्मक पावले उचलण्यात येणार असल्याचे संकेत संघटनेकडून मिळाले आहेत. 'आम्ही आरोग्यासाठी जीव धोक्यात घालतो, पण आमच्यासाठी कोण?' असा संतप्त सवाल राज्यभरातील हजारो आशा सेविका विचारत आहेत. आशा सेविकांच्या न्यायासाठी आता निर्णायक लढा अनिवार्य झालाय! शासन किती दिवस गप्प बसणार?

# रिसोड-मोठेगाव राज्य महामार्गाचे काम अपूर्ण

## अपघातांची शक्यता वाढली; शालेय मुलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**रिसोड** - शहरापासून मोठेगाव मार्गे सुरु असलेले राज्य महामार्गाचे काम गेल्या अनेक वर्षांपासून संथ गतीने सुरू असून, सद्यस्थितीत या अपूर्ण कामामुळे प्रवाशांना, विशेषतः शालेय विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.



या रस्त्याची अवस्था इतकी दयनीय झालेली आहे की, धूळ, मोठमोठाले खड्डे आणि अपूर्ण संरचना यामुळे प्रवास अतिशय धोकादायक ठरत आहे. पावसाळा तोंडावर येऊन ठेपलेला असताना देखील या रस्त्याच्या कामात कोणतीही गती दिसून येत नाही. या मार्गावर वाहनांची वाढती संख्या आणि एकाच बाजूने सुरु असलेले अपूर्ण काम यामुळे अपघातांची शक्यता प्रचंड वाढली आहे. विशेषतः सकाळी व सायंकाळी शाळेच्या वेळेस या रस्त्यावरून जाणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रचंड धोक्याची शक्यता आहे. पालकांमध्ये या बाबत तीव्र चिंता व्यक्त होत असून, अनेकांनी आपल्या मुलांना सुरक्षिततेच्या दृष्टीने शिक्षणासाठी रिसोडमध्ये खोली घेऊन ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, या महामार्गावरून प्रवास करताना प्रत्येक क्षणी अपघाताची भीती वाटते. अनेकवेळा वाहनांची समोरासमोर धडक होत असून काही गंभीर अपघात घडल्याचे ही निदर्शनास आले आहे. स्थानिक वाहनचालक, व्यापारी, शेतकरी, विद्यार्थी आणि महिला प्रवाश्यांना यामुळे मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर जनतेतून तीव्र नाराजी व्यक्त होत असून, ठेकेदार व संबंधित अभियंत्यांनी तातडीने या रस्त्याचे काम जलदगतीने पूर्ण करावे, अशी मागणी केली जात आहे. अपघात घडून मोठा अनर्थ होण्यापूर्वी प्रशासनाने या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे. अन्यथा, भविष्यात घडणाऱ्या दुर्घटनांना ठेकेदार आणि प्रशासन जबाबदार राहील, अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकांकडून येत आहे.

# मेडशी बायपासवर भीषण अपघात : दोन ठार, एक जखमी

## अकोला-नांदेड राष्ट्रीय महामार्गावर रात्रीचा थरार

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**मेडशी** - दि. १४ जून रोजी रात्री सुमारे १० वाजता अकोला-नांदेड राष्ट्रीय महामार्गावरील मेडशी बायपास परिसरात एका हॉटेलजवळ भीषण अपघात घडला. भरधाव ट्रकने रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या टँकरला जबर धडक दिल्याने दोन जणांचा जागीच मृत्यू झाला असून, एक जण गंभीर जखमी झाला आहे. विशेष म्हणजे, घटनास्थळी उपस्थित असलेल्या कारमधील दोघे प्रवासी थोडक्यात बचावले असून मात्र त्यांची कार पूर्णतः चक्काचूर झाली आहे.



प्राप्त माहितीनुसार, आरजे-०९ जीसी ०५४४ क्रमांकाचा ट्रक मालेगावकडून पातूरच्या दिशेने जात असताना, रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या एमएच-३० बीपी ८२२९ क्रमांकाच्या टँकरला जोरदार धडक दिली. ट्रकची धडक इतकी जबर होती की, टँकर थेट उलटला आणि रस्त्यालगत उभ्या एमएच-३७ एएच १५३१ क्रमांकाच्या कारवर आदळला. या अपघातात टँकर चालक शेख शोएब शेख मुजीब (वय २५, रा. गंगानगर, अकोला) व त्यांना भेटण्यासाठी दुसऱ्या टँकरमधून आलेले शेख जावेद शेख सलीम (वय ४५, रा. अर्धापूर, जि. नांदेड) या दोघांचा जागीच मृत्यू झाला. अपघातात टँकर क्लीनर हाफीजसोद्दीन मुजिबोद्दीन (वय ३५, रा. गंगानगर, अकोला) हे गंभीर जखमी झाले आहेत. दरम्यान, टँकर उलटून ज्या कारवर आदळला, त्यामध्ये मंजीत मुंडे व त्यांचे सहकारी बसले होते. अपघाताच्या क्षणी कारमध्ये असलेले हे दोघे आश्चर्यकारकरित्या थोडक्यात बचावले. मात्र, कारचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. घटनेची माहिती मिळताच मेडशी पोलिस चौकीचे कर्मचारी तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी जखमीला रुग्णालयात हलवले तसेच मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी पाठवले. घटनेमुळे परिसरात काही वेळ वाहतूक ठप्प झाली होती. या अपघातामुळे महामार्गावरील वाहतुकीच्या सुरक्षिततेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, रात्रौ मोठ्या वाहनांची बेजबाबदारपणे होणारी वाहतूक ही जीवघेणी ठरत असल्याची चर्चा स्थानिक नागरिकांत सुरू आहे.

# जागतिक रक्तदाता दिवस भाजपा शहर मंडळची जिल्हा रुग्णालयाला भेट

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**वाशीम** - जागतिक रक्तदाता दिवसाचे औचित्य साधून भारतीय जनता पार्टी वाशिम शहरच्या वतीने जिल्हा शासकीय रुग्णालय येथे ये जाऊन तेथे उपस्थित असलेल्या डॉक्टरांचे व स्टाफचे पक्षाच्या वतीने स्वागत करण्यात आले विशेष बाब म्हणजे हा उपक्रम नुकतेच शहराध्यक्षपदी नियुक्त झालेले श्री. मनीष मंत्री यांच्या पुढाकारातून संपन्न झाला आणि त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.



रक्तदान ही सर्वोच्च मानवसेवा मानली जाते. या दिवशी श्री. मनीष मंत्री यांनी सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवून पक्षातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांसह शासकीय रक्तपेढीला भेट दिली. त्यांनी रक्तदात्यांशी संवाद साधून त्यांना शुभेच्छा दिल्या व कार्यकर्त्यांनाही रक्तदानासाठी प्रेरित केले. त्यांच्या प्रेरणादायी नेतृत्वाचा सकारात्मक परिणाम म्हणून तीन कार्यकर्त्यांनी तत्काळ जागेवरच रक्तदान केले. या कार्यकर्त्यांमध्ये श्री. सचिन शर्मा, ताजने काळे सर व इतर सदस्यांचा समावेश होता. कार्यक्रमात सर्व रक्तदात्यांचा शाल व श्रीफळ देऊन विशेष सत्कार करण्यात आला. यामुळे रक्तदात्यांचे मनोबल उंचावले आणि एक सामाजिक आदर्शही उभा राहिला. कार्यक्रमाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्या दिवशी बाकलीवर शाळेच्या विद्यार्थिनींनी लावलेली सामाजिक संदेश देणारी चित्रप्रदर्शनी. श्री. मनीष मंत्री यांनी ही प्रदर्शनी पाहून विद्यार्थिनींच्या कलाकृतींचे मनःपूर्वक कौतुक केले व त्यांना प्रोत्साहन दिले.

या उपक्रमाच्या यशामध्ये भाजपा वाशिम शहरचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच शासकीय रक्तपेढीचे कर्मचारी आणि जिल्हा रुग्णालयातील अधिकारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. मनीष मंत्री यांनी शहराध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर पहिल्याच सामाजिक उपक्रमाच्या माध्यमातून जनतेमध्ये एक सकारात्मक संदेश दिला आहे.

रुग्णालय प्रशासनासह वाशिममधील नागरिकांकडून त्यांच्या सामाजिक भान आणि संवेदनशीलतेचे विशेष कौतुक होत असून, हा उपक्रम भविष्यातील कार्याची दिशा दर्शवणारा ठरतो आहे. उपरोक्त कार्यक्रमांमध्ये सचिन शर्मा, शिवम ताजने व अनिकेत धांडे यांनी रक्तदान करून आपले कर्तव्य बजावले सदर कार्यक्रमांमध्ये रामा इंगळे, सुनील तापडिया, निलेश जयस्वाल, सचिन शर्मा, गिरीश शर्मा, वैभव उलेमाले, देवेंद्र बागरेचा, शेखर बंठे, गणेश सावळकर, दीपक बांगर आदी भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी उपस्थित होते.

# अनित्य स्मशानभूमीत 'फादर्स डे' निमित्त वृक्षारोपणाचा स्तुत्य उपक्रम

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**रिसोड** - :शहरातील अनित्य स्मशानभूमीत समाजाप्रती जबाबदारीची जाणीव ठेवत 'फादर्स डे'चे औचित्य साधून दि. १५ जून रोजी विठाई मायनॉरिटी बहुउद्देशीय प्रतिष्ठानच्या वतीने वृक्षारोपणाचा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमात संस्थापक अध्यक्ष प्रदीप वसंतराव खंडारे यांच्या दिवंगत वडील स्व. वसंतराव खंडारे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ वृक्ष लावण्यात आले. स्मशानभूमीसारख्या उपेक्षित ठिकाणी हिरवाई निर्माण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा हा उपक्रम उपस्थितांमध्ये विशेष सकारात्मकता निर्माण करणारा ठरला. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी अनेक प्रकारचे वृक्ष लावून परिसर सुशोभित करण्याचा संकल्प केला. या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष प्रदीप खंडारे यांनी सांगितले की, 'वृक्षारोपण ही काळाची गरज आहे. पर्यावरण संकट गडद होत असताना समाजातील प्रत्येक घटकाने अशा प्रकारच्या उपक्रमात सहभाग घ्यावा. आम्ही केवळ वृक्ष लावत नाही, तर भविष्यासाठी जीवन रुजवत आहोत.' कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी भगवान जुमडे, जियाउर खान, आकाश जुमडे, आकाश जाधव, सुनील पंडित व इतर पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी पुढाकार घेतला.



विठाई मायनॉरिटी बहुउद्देशीय प्रतिष्ठान ही संस्था सामाजिक कार्यात सातत्याने अग्रेसर असून व्यसनमुक्ती, महिला सक्षमीकरण, गरीब व गरजूंसाठी मदत, तसेच पर्यावरणपूरक उपक्रम हे त्यांच्या कार्याचे प्रमुख क्षेत्र आहे. कार्यक्रमाच्या शेवटी अध्यक्ष खंडारे यांनी समाजातील दानशूर व्यक्तींना आवाहन केले की, 'संस्थेच्या विविध सामाजिक उपक्रमांना मदत करून अधिक व्यापक प्रमाणात सकारात्मक बदल घडवूया.'

# रुग्णालयात उपचार नाही, थेट इन्फेक्शन
## मंगरूळपीर ग्रामीण रुग्णालयात मृत्यूच्या छायेत मातृत्व!

▸ गौरवकुमार इंगळे ▸

**मंगरूळपीर** - तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयाचा निष्काळजीपणा पुन्हा एकदा समोर आला आहे. पारवा येथील रहिवासी देवानंद धोंडू गायकवाड यांनी केलेल्या पोलीस ठाण्यात दिलेल्या गंभीर तक्रारीनुसार, त्यांच्या पत्नी दिपाली गायकवाड यांच्यावर रुग्णालयात प्रसूतीच्या वेळी झालेल्या चुकीच्या उपचारामुळे तिच्या आरोग्याला गंभीर धोका

निर्माण झाला आहे २३ मे रोजी सकाळी आठ वाजता प्रसूतीसाठी रुग्णालयात दाखल झालेल्या दिपालीबाईंची संध्याकाळी पाच वाजून १३ मिनिटांनी डिलिव्हरी झाली. डिलिव्हरीनंतर काही टाके लागल्याने त्यांना २६ मे पर्यंत रुग्णालयात ठेवण्यात आले.



डॉक्टरांनी 'सर्व काही ठीक आहे' असे सांगितल्याने गायकवाड कुटुंबीय गाफील राहिले. मात्र, काही दिवसात वेदना सुरू झाल्यानंतर ३० मे रोजी त्यांना कारंजा येथील विठ्ठल हॉस्पिटलमध्ये दाखल करावे लागले.तेथे तपासणी केल्यानंतर डॉक्टर गुंजाटे मॅडम यांनी धक्कादायक सत्य उघड केले - 'टाके लावलेल्या ठिकाणचा कापूस रुग्णालयात काढलेलाच नव्हता! त्यामुळे त्या ठिकाणी जीवघेणा संसर्ग (इन्फेक्शन) झाले आहे.' गंभीर बाब म्हणजे गायकवाड यांनी याबाबत मंगरूळपीर ग्रामीण रुग्णालयाशी संपर्क साधला असता, तेथील अधिकाऱ्यांनी 'कापूस काढणे तुमचे काम होते' असा बेजबाबदार आणि निर्लज्ज उत्तर देऊन जबाबदारी झटकली. सरकारी रुग्णालयात उपचारासाठी भरवसा ठेवणाऱ्या गरीब रुग्णांबरोबर असा खेळ चालूच राहणार का?

**जिल्हा शल्य चिकित्सकांकडे पाठपुरावा व्यर्थ!**

सदर प्रकरणावर जिल्हा शल्यचिकित्सकांना संपर्क केल्यावर त्यांनी टाळाटाळीची भूमिका घेतली. त्यामुळे गायकवाड कुटुंबीयांनी याबाबतचे थेट मंगरूळ पोलीस ठाण्यात दिली आहे.

**खाजगी रुग्णालयात हजारो रुपये खर्च!**

शासकीय रुग्णालयाकडून जीवाशी खेळल्यामुळे रुग्णाच्या कुटुंबाला खाजगी रुग्णालयात हजारो रुपयांचा खर्च करावा लागला आहे. 'गरिबीमुळे सरकारी रुग्णालयात उपचारासाठी आलो, पण आता वाटतं ही सर्वात मोठी चूक झाली,' अशी खदखद देवानंद गायकवाड यांनी व्यक्त केली. प्रश्न उपस्थित होतोय कि. सरकारी रुग्णालयात रुग्णांच्या जीवाची काही किंमत उरली आहे का? अशा निष्काळजी कर्मचाऱ्यांवर कायदेशीर आणि प्रशासनिक कारवाई होणार की नेहमीप्रमाणे हा प्रकार गिळून टाकला जाणार? जनतेच्या जीवाशी खेळणाऱ्या डॉक्टरांचा हा प्रकार फक्त 'चूक' नव्हे, तर हा 'गुन्हा' आहे! आरोग्य खात्याने तात्काळ चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी अशी जोरदार मागणी करण्यात येत आहे.

# कारंजा उपजिल्हा रुग्णालयाला व्हिल चेअर भेट!

▸ महासागर प्रतिनिधी ▸

**मंगरूळपीर** - कारंजा :अनुप ठाकरे यांनी स्व.प्रमोद विठ्ठलराव ठाकरे यांच्या स्मृती प्रित्यर्थ नवनिर्माण फाउंडेशनच्या वतीने कारंजा येथील उपजिल्हा रुग्णालयाला व्हिल चेअर भेट देऊन एक स्तुत्य उपक्रम राबविला आहे. उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. नथुरामजी साळुंखे, परिसेवीका अर्चना ठाकरे, औषधी निर्माता दिलीप भोयर, रक्त पेठी सहायक चंदन वासणीक, अधिपरिसेवक सावंत कोल्हे,यांच्या उपस्थितीत व्हिल चेअर रुग्णालयास भेट देण्यात आली.



सध्या राज्यात कोरोनाची पुन्हा एकदा भयंकर अशी परिस्थिती तयार होत असून अशा जागतिक महामारीत असंख्य रुग्णांना ऑक्सिजन न मिळाल्याने आपला जीव गमवावा लागत आहे.तसेच दररोज अपघात व अन्य जीवघेण्या आजारामुळे शेकडो रुग्ण रुग्णालय गाठतात. आणि ज्यांची तब्येत जास्त खालावलेली असते अशा लोकांना चालत जाऊन चार पावले टाकणे सुद्धा अशक्य होत असतें तेव्हा अशावेळी त्यांच्यासाठी व्हिल चेअर ही फारच महत्वाची व उपयोगी ठरते. कारंजा उपरुग्णालयात व्हिल चेअर दयनीय व दुरुस्तीच्या अवस्थेत असल्याने रुग्णांना अशा नादुरुस्त व्हिल चेअर वापरतांना अत्यंत त्रास होतो. आणि नेमकी हीच बाब नवनिर्माण फाउंडेशन कारंजाचे अध्यक्ष अनुप ठाकरे यांनी हेरली व स्वतः पुढाकार घेऊन स्व.प्रमोद विठ्ठलराव ठाकरे यांच्या स्मृतिप्रित्यर्थ रुग्णालयास व्हिल चेअर स्वखर्चाने भेट करून समाज ऋण फेडायचे अत्यंत पुण्याचे काम केले.कारंजा शहर किंवा परिसरात समाज उपयोगी कार्य करण्यास अनुप ठाकरे हे नेहमीच अग्रेसर असतात.अनुप ठाकरे यांनी रुग्णांच्या सेवेत अल्पदरात आपल्या रुग्णवाहीका सुद्धा उपलब्ध करून दिलेल्या आहेत.

कोणताही स्वार्थ न बघता गरजुच्या मदतीसाठी धावून जाण्याची त्यांची नेहमीच धडपड असते.व्हिल चेअर रुग्णालयास भेट देता प्रसंगी नवनिर्माण फाउंडेशनचे अध्यक्ष अनुप ठाकरे , नवनिर्माण फाउंडेशनचे कोषाध्यक्ष नितीन तायडे, अनिल काटोले, विनोद काळे, रशिद गारवे, ॲड. ऋषिकेश चव्हाण, विनोद बांडे, नवनिर्माण फाउंडेशनचे संचालक डॉ. मंगेश ताथोड, नवनिर्माण फाउंडेशनचे संचालक पुंडलिक लसनकुटे,शुभम रोकडे, ललित देशमुख आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# कथ्थक विशारद होणारी वाशिमची पहिली विद्यार्थिनी!
## गौरी पाटील हिने मिळवली ५२८ गुणांसह प्रथम श्रेणी!

▸ महासागर प्रतिनिधी ▸

**वाशिम** - वाशिमच्या सांस्कृतिक क्षेत्रात एक ऐतिहासिक आणि अभिमानास्पद पर्वनी घडली आहे. 'कला संस्कार कथ्थक ॲंड ड्रॉइंग फाउंडेशन' या संस्थेच्या कु. गौरी माधव पाटील हिने कथ्थक नृत्य या पारंपरिक भारतीय नृत्यप्रकारात अखिल भारतीय गंधर्व महाविद्यालय मंडळ, मुंबई आयोजित कथ्थक विशारद परीक्षा उत्तीर्ण करत ५२८ गुणांसह प्रथम श्रेणी मिळवून यशाचा नवा इतिहास घडवला आहे.

गौरीचे हे यश केवळ तिचेच नसून संपूर्ण वाशिम जिल्ह्यासाठी गौरवाचे आहे. या परीक्षेमध्ये देशभरातून शेकडो विद्यार्थी सहभागी होतात. मात्र, वाशिम जिल्ह्यातून पहिल्यांदाच कोणीतरी विद्यार्थिनीने ही कठीण पदवी परीक्षा यशस्वीरीत्या पूर्ण करून नाम कमावले आहे.ही कामगिरी शक्य झाली ती म्हणजे संस्थेच्या संस्थापिका आणि अध्यक्षा सौ.राधिका मंत्री यांच्या कुशल मार्गदर्शनामुळे आणि गौरीच्या अविरत मेहनतीमुळे. मागील ८ वर्षांपासून गौरी सातत्याने



कथ्थकच्या सरावात गुंतलेली असून तिच्या पालकांनी तिच्या प्रत्येक पावलात खंबीर साथ दिली आहे. माधव आणि भाग्यश्री पाटील यांचे विशेष उल्लेख करावा तितका आहे. गौरीने केवळ आपलेच नव्हे, तर 'कला संस्कार' संस्थेचे आणि वाशिम जिल्ह्याचे नावही उज्ज्वल केले आहे. तिच्या या यशामुळे वाशिम जिल्ह्यातील अनेक विद्यार्थ्यांना शास्त्रीय नृत्याच्या वाटेवर प्रेरणा मिळेल, हे निश्चित. सौ.राधिका मंत्री यांनी सांगितले की, 'कथ्थक हे केवळ एक नृत्य नाही, तर भारतीय संस्कृतीचे प्रातिनिधिक माध्यम आहे. यामधून शारीरिक आणि मानसिक संतुलन, आत्मविश्वास आणि एकाग्रता विकसित होते. शिक्षणासोबत ही कला विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाची भूमिका बजावते.' आज 'कला संस्कार' संस्थेतून अनेक विद्यार्थी कथ्थक, संगीत आणि चित्रकलेचे प्रशिक्षण घेत आहेत. संस्थेने आतापर्यंत अनेक विद्यार्थ्यांना स्पर्धा, कार्यक्रम व परीक्षांमध्ये घडवून आणले आहे. भविष्यात हे विद्यार्थी राज्य व राष्ट्रीय स्तरावर यशस्वी ठरतील, असा दृढ विश्वास मंत्री यांनी व्यक्त केला. या यशानंतर वाशिममधील कला रसिक, पालकवर्ग व नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. संस्कृतीच्या संवर्धनासाठी प्रत्येक पालकाने आपल्या पाल्यांना शास्त्रीय कलांमध्ये भाग घेण्यास प्रोत्साहन द्यावे, असे आवाहनही या निमित्ताने करण्यात आले आहे.

# बाजार समिती परिसरात वृक्षारोपण!



▸ महासागर प्रतिनिधी ▸

मालेगाव- आंतरराष्ट्रीय सहकार वर्षाच्या निमित्ताने 'एक वृक्ष आईच्या नावाने' या भावनिक आणि प्रेरणादायी उपक्रमांतर्गत शुक्रवारी स्थानिक कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

या कार्यक्रमात आमदार अमित झनक यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.यावेळी बाजार समितीचे सभापती ॲड. संतोष पोफळे, उपसभापती संदीप घुगे, संचालक रवि भुतडा, उद्धव गोडे, उल्हासराव घुगे, भूषण खाडे, दादाराव आदमने, राजू गिद, सुरेश शिंदे, डॉ. निलेश मानधने तसेच व्यापारी महेश जाजू , मुरलीधर परताणी, दशरथ वानखेडे, किशोर काबरा, विजय अडिचवाल, कृष्णा अहिर, विठ्ठल बोरचाटे यांसह इतर व कर्मचारी उपस्थित होते. या वृक्षारोपण उपक्रमाचा उद्देश पर्यावरण संरक्षणा बाबत जनजागृती निर्माण करणे तसेच सहकार तत्वांनुसार सामाजिक बांधिलकी जपणे हा होता. उपस्थितांनी आपल्या मातांच्या स्मरणार्थ वृक्षारोपण करून उपक्रमाला एक भावनिक अधिष्ठान दिले.

कार्यक्रमाच्या शेवटी वक्त्यांनी सहकार भावना बळकट करण्याबरोबरच पर्यावरण रक्षणासाठी लोक सहभाग वाढविण्याचे आवाहन केले.

# झाशी राणी चौक, मंगरुळपीर रोड, मानोरा रोडवर गतिरोधक कधी?
## सार्वजनिक बांधकाम विभागावर प्रश्नचिन्ह!

▸ महासागर प्रतिनिधी ▸

**कारंजा** - शहराच्या प्रमुख मार्गांवर अपघातांचे सावट दिवसेंदिवस गडद होत असताना, सार्वजनिक बांधकाम विभाग मात्र खोल झोपेत आहे का, असा थेट सवाल आता शहरातील नागरिक, विद्यार्थी आणि पालकवर्ग करत आहेत. झाशी राणी चौक, मंगरुलपीर रोड आणि मानोरा रोड या ठिकाणी वाहतुकीची वर्दळ मोठ्या प्रमाणात असूनही या ठिकाणी एकही



गतिरोधक बसवलेला नाही, ही बाब गंभीर आणि धक्कादायक आहे.

नुकत्याच शहरातील बायपास परिसरात अतिक्रमण हटविण्यात आले, हे कौतुकास्पद असले तरी रस्त्यावरील सुरक्षिततेच्या बाबतीत प्रशासन अजूनही उदासीनच आहे. येत्या २३ जूनपासून सर्व शाळा आणि महाविद्यालये सुरू होणार असताना, शालेय मुलांची वाहतुकीदरम्यान होणारी धावपळ, दुचाकी वाहनांची बेफाम गति, अपुऱ्या सुरक्षा उपाययोजना हे सगळं मोठ्या दुर्घटनांना आमंत्रण देणारे आहे. 'दुर्घटना घडल्याशिवाय उपाययोजना का?' असा संतप्त सवाल पालकांकडून उपस्थित केला जात असून, त्यांच्या मनात भीतीचं सावट आहे. या गंभीर मुद्द्याकडे लक्ष वेधत कारंजा-मानोरा मतदारसंघाच्या आमदार सौ. सई डहाके यांनी याकडे जातीने लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे.शहरातील अनेक मुख्य चौक, शाळा परिसर, कॉलेज रोड, हॉस्पिटल रस्ते अशा ठिकाणी तात्काळ गतिरोधक बसवणे अत्यावश्यक आहे. त्याशिवाय वाहतुकीला नियमन, तसेच नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न धोक्यात येतो. केवळ कागदोपत्री योजना नकोत, तर प्रत्यक्ष अंमलबजावणी हवी, अशी आक्रमक मागणी नागरिकांकडून होत आहे.जर सार्वजनिक बांधकाम विभागाने तत्काळ हालचाल केली नाही, तर शहरवासीय रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलनाचा मार्ग पत्करतील, असा इशारा सुद्धा काही सामाजिक संघटनांनी दिला आहे. 'आधी गतिरोधक, मग शाळा सुरू!' अशी भूमिका आता पालकांनी घेतली असून, संबंधित विभाग आणि लोकप्रतिनिधींनी तात्काळ लक्ष घालून ठोस निर्णय घ्यावा, हीच जनतेची आक्रमक मागणी आहे.

# अनसिंगमध्ये पाणीटंचाईचा बळी ठरली 'तनुजा'!

▸ महासागर प्रतिनिधी ▸

**वाशीम**- अनसिंग गावातील सीतावाडी व रामवाडी वस्तीतील पाणीटंचाईचा प्रश्न आता केवळ विकासाचा मुद्दा राहिलेला नसून थेट जीवघेणा बनला आहे. याच गावात तनुजा अनिल खरात (वय १९) या तरुणीचा भ्रष्ट आणि बेजबाबदार ग्रामपंचायतीच्या कारभारामुळे मृत्यू झाला. गरिबीच्या ओझ्याखाली दबलेल्या तनुजाच्या शेत शिवारातील विहिरीवर पाणी आणायला गेली, आणि तिथे तिच्या अंगावर वीज कोसळून तिचा जागीच मृत्यू झाला. तिच्यासोबत असलेल्या गंगाबाई लाटे (वय ४०) या महिला गंभीर जखमी असून त्या रुग्णालयात मृत्यूशी झुंज देत आहेत.

**हा अपघात नाही - ही हत्या आहे!**



तनुजाचा मृत्यू ही कोणती नैसर्गिक घटना नसून, ग्रामपंचायतीच्या हलगर्जीपणा, भ्रष्टाचार आणि बेशिस्त कारभारामुळे घडलेली सामाजिक हत्या आहे, असा थेट आरोप समाजसेवक राजकुमार पडघान यांनी केला आहे.

**कोट्यवधींचा निधी कुठे गेला?**

'घर घर नल' योजनेच्या नावाखाली केंद्र व राज्य शासनाकडून ग्रामपंचायतीला कोट्यवधी रुपयांचा निधी मिळतो, पण तो कोणाच्या खिशात गेला? सीतावाडी व रामवाडी वस्तीतील महिलांना आजही उन्हातान्हात डोक्यावर हंडे घेऊन मैलोनमैल पाणी आणावे लागते. ही लोकप्रतिनिधींची आणि प्रशासनाची थेट माणुसकी हरवलेली बेपर्वाई आहे.

**प्रशासन गप्प, ग्राम पंचायत गोंधळलेली!**

तनुजाच्या मृत्यूनंतरही ग्रामपंचायत शांत आहे, कुठलाही जबाबदार पुढे येऊन उत्तर देत नाही. प्रशासनाकडूनही अद्याप कोणतीही ठोस मदत पीडित कुटुंबाला मिळालेली नाही. हा अत्यंत लज्जास्पद आणि संतापजनक प्रकार आहे.

> 'पाणी नाही म्हणून माणसं मरतायत, आणि शासन निधी खाल्ला जातोय! आता गप्प बसणार नाही. जर दोषींवर कारवाई झाली नाही तर अनसिंग ग्रामपंचायतीसमोर तीव्र जनआंदोलन होईल!'
>
> -राजकुमार पडघान

सरकारने, जिल्हा प्रशासनाने आणि संबंधित विभागांनी ही घटना ही एक इशारा म्हणून घेतली पाहिजे. तनुजासारखी निरागस मुलगी केवळ पाणी भरायला गेल्यामुळे मरण पावते, आणि कोणालाही याची किंमत भरण्याची भीती नाही, ही स्थिती लोकशाहीची थट्टा आहे.

**मागण्या थेट - अन्यथा आंदोलन**

समाजसेवक राजकुमार पडघान यांनी प्रशासनाला निवेदनाद्वारे दिलेल्या खोल आणि थेट मागण्याः

१. अनसिंग ग्रामपंचायतीवर मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करावा.

२. तनुजाच्या कुटुंबीयांना त्वरित १० लाख रुपयांचे सानुग्रह अनुदान द्यावे.

३. जखमी गंगाबाई लाटे यांच्या उपचाराचा खर्च प्रशासनाने करावा.

४. पाणीटंचाईला कारणीभूत असलेल्या संबंधित अधिकाऱ्यांवर निलंबन व गुन्हे दाखल करावेत.

# निवासी अतिक्रमणाबाबत काजळांबा ग्रा.पं.च्या सरपंच व सचिवाचा भेदभाव

▸ महासागर प्रतिनिधी ▸

**वाशिम** - तालुक्यातील ग्राम काजळांबा येथील सरपंच व सचिवाने निवासी अतिक्रमण हटविण्याबाबत भेदभाव केला असून फासेपारधी व गरीब कुटुंबांना निष्कासित करण्याच्या नोटीसमुळे गावात असंतोषाचे वातावरण पसरले आहे. मात्र सरपंच व ग्रा.पं. सदस्यांनी गावात अतिक्रमण केले असून सरकारी हापशीवर कब्जा केला आहे. तसेच व्यायामशाळेसाठी आलेल्या निधीचा स्वतःसाठी वापर केला आहे. याप्रकरणी तीव्र आंदोलन छेडण्यात येणार असल्याचा निर्णय बिगर सातबारा शेतकरी संघटनेने घेतला आहे. याप्रकरणी शुक्रवार, १३ जून रोजी स्थानिक विश्रामगृहात बैठक घेवून चर्चा करण्यात आली.

बैठकीच्या अध्यक्षस्थानी समशेरसिंग भोसले फासेपारधी संघटनेच्या प्रदेशाध्यक्षा श्रीमती वैशाली पवार यांची उपस्थिती होती. तर प्रमुख पाहुणे म्हणून बिगर



बिगर सातबारा शेतकरी संघटनेचा तीव्र आंदोलनाचा इशारा

सातबारा शेतकरी संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष भाई जगदीशकुमार इंगळे, जिल्हाध्यक्ष राजु इंगोले, मानवी हक्क अभियानाच्या राष्ट्रीय महिलाध्यक्षा रोहिणी खंदारे यांची उपस्थिती होती. बैठकीत प्रामुख्याने काजळांबा येथील निवासी अतिक्रमणाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी बोलतांना जगदीश इंगळे म्हणाले की, काजळांबा येथील सरकारी ई-क्लास गट क्र. १७९ मध्ये केलेले अतिक्रमण सात दिवसाच्या आत काढून घेणेबाबत ग्रामपंचायतकडून सरपंच गणेश उगले यांनी नोटीसा बजावल्या आहेत. यावेळी जेष्ठ नागरिक संजय उगले यांनी पुराव्यानिशी सांगीतले की, सरपंच गणेश उगले यांच्यासह त्यांच्या परिवारातील सदस्यांनी व ग्रा.पं. सदस्यांनी सरकारी जागेवर अतिक्रमण केले असून गणेश उगले यांनी व्यायामशाळेला गुरांचा गोठा बनविला आहे. व त्यामध्ये जनावरे बांधली आहेत. राजकुमार काजळे यांनी सांगीतले की, सरपंच उगले यांनी सरकारी हॅन्डपंपवरही अतिक्रमण केले असून यावर बोअरवेल मशीन बसवून स्वतःकरीता पाणी वापरणे सुरु आहे. तसेच जलजोडणी प्रकल्पनिर्मितीत भेदभाव झाला असून मागासवर्गीय वस्तीत नळजोडणी झाली नसल्याचा आरोपही संजय उगले यांनी केला आहे. असे अनेक प्रकार होत असतांना केवळ गोरगरीब लोकांना नोटीसा बजावून त्यांचे अतिक्रमणे निष्कासित करण्याचा प्रकार हा अन्यायकारक आहे. हा प्रकार अजिबात खपवून घेणार नसून याबाबत संघटनेच्या वतीने कायदेशीर लढा उभारणार असल्याचा निर्धार बैठकीत व्यक्त करण्यात आला. तसेच फासेपारधी समाजाला बेघर होण्यापासून वाचविण्यासाठी महसुल विभागाकडे पाठपुरावा करणार असल्याचे समशेरसिंग भोसले फासेपारधी संघटनेच्या सौ. वैशाली पवार यांनी सांगीतले. संघटनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार व भाई जगदीश इंगळे यांच्या मार्गदर्शनात लवकरच प्रशासकीय बैठक आयोजीत करून निवासी अतिक्रमणाबाबत सरकारी स्तरावर सकारात्मक निर्णय होण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे मत बिगर सातबारा शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष राजु इंगोले यांनी व्यक्त केले. बैठकीला रवि पडघान, प्रेम पवार, राजकुमार काजळे, किरण काजळे, देविदास काजळे, शिलाबाई काजळे, उर्मिला ठोंबरे, पद्मीना इंगोले, नंदु गादेकर, गौतम मानवर, संजु उगले आदींसह बिगर सातबारा शेतकरी संघटना फासेपारधी संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# मानोरा तालुक्यात 'भारत कृषि जागरण यात्रा

▸ महासागर प्रतिनिधी ▸

**मानोरा** - कृषि मंत्रालय, भारत सरकार; भारतीय कृषि अनुसंधान परिषद (ICAR), नवी दिल्ली; कृषि विद्यापीठे; कृषी विज्ञान केंद्रे; तसेच महाराष्ट्र शासनाचा कृषि विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'विकसीत कृषि संकल्प अभियान २०२५' दिनांक २९ मे ते १२ जून २०२५ दरम्यान राबविण्यात आला. याच पार्श्वभूमीवर दिनांक ८ ते १२ जून २०२५ या कालावधीत मनोरा तालुक्यातील १५ गावांमध्ये भारत कृषि जागरण यात्रा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.



या कार्यक्रमात देवठाण, सोमठाणा, सोमनाथनगर, तळप, अजनी, इंजोरी, मानोरा, विठोली, बेलोरा, गव्हा, गिरोली, कोलार, हळदा, वाईगौळ व पोहरादेवी या गावांमध्ये शेतकरी व ग्रामीण समुदायाला शेती व पूरक व्यवसायातील सुधारित तंत्रज्ञान, आधुनिक कृषि सल्ला आणि शासनाच्या योजनांविषयी सखोल मार्गदर्शन करण्यात आले.या यात्रेत राष्ट्रीय लिंबू वर्गीय फळ संशोधन केंद्र, नागपूर येथील शास्त्रज्ञ डॉ. ए. के. दास व डॉ. यू. आर. सांगडे, कृषी विज्ञान केंद्र वाशिमचे प्रमुख डॉ. आर. एल. काळे, गृहविज्ञान प्रमुख शुभांगी वाटाणे, तालुका कृषि अधिकारी राठोड, तसेच विविध गावांतील सरपंच, ग्रामसेवक व प्रगतशील शेतकरी उपस्थित होते. यात्रेदरम्यान डॉ. दास यांनी फळपिकांची जोड देऊन आर्थिक सशक्तीकरणाचा संदेश दिला. डॉ. सांगडे यांनी किड व रोग व्यवस्थापनासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना सांगितल्या. डॉ. काळे यांनी एकात्मिक किड व्यवस्थापन, जैविक निविष्ठा, नैसर्गिक शेतीतील पिकसंरक्षण, ड्रोन तंत्रज्ञान, बीज प्रक्रिया, हळद व भाजीपाला उत्पादन व मूल्यवर्धन यासंबंधी तांत्रिक मार्गदर्शन केले.शुभांगी वाटाणे यांनी माती परीक्षण, जमिनीच्या व मानवी आरोग्याचा संबंध अधोरेखित करत नैसर्गिक शेतीच्या अंगीकाराचे आवाहन केले.तालुका कृषि अधिकारी राठोड यांनी कृषि विभागाच्या योजनांची माहिती देत खरीप हंगामात त्याचा उपयोग कसा होईल यावर भर दिला.डॉ. डी. एन. इंगोले यांनी शेतीतील अर्थशास्त्र सोप्या भाषेत समजावले. कार्यक्रमास ग्राम पंचायत सदस्य, शेतकरी, बचत गट महिला, युवक, कृषी सखी, शेतकरी उत्पादक कंपन्यांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या अभियानाच्या यशस्वीतेसाठी कृषी विज्ञान केंद्र करडा, वाशिम येथील एस. आर. बावस्कर, अक्षय गिरी, तसेच मनोरा तालुक्यातील कृषी सहाय्यक व कर्मचारी वर्गाने अत्यंत कौशल्यपूर्ण आणि समर्पितपणे कार्य केले.

RNI No-46973/1986 महासागर वाशिम
मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनमुखदास चांडक यांनी, अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर -१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, महात्मा फुले मार्केट, पाटणी चौक येथे प्रकाशित केले.
संपादक -श्रीकृष्ण तनमुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन -९९२२१७००२३ स्थानिक संपादक विनोद तायडे मो नं -९५६३६४५५५५ (पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील )

